*Annexure IX (12), (Vide Article - 9.01 (xv))*

वनक्षेत्रात प्लॅस्टीकच्या वापरावर
बंदी आणणे.

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी -१०.०७/प्र.क्र.२७/फ-१,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ फेब्रुवारी, २००७

**शासन निर्णय :-**

वनक्षेत्रामधील संरक्षित क्षेत्रात तसेच संरक्षित क्षेत्राबाहेरसुध्दा मोठ्या प्रमाणात वन्य प्राणी आढळून येतात. अशा क्षेत्रात मानवाचा शिरकाव झाल्याने काही हानीकारक बाबींना चालना मिळून वन्यजीवांच्या जिवास धोका निर्माण झाला आहे. विशेषतः पर्यटकांकडून प्लॅस्टीकच्या अनिर्बंध वापरामुळे प्लॅस्टीक वनक्षेत्रात विखुरले जाऊन अन्नाचाच भाग समजून भक्षण केल्या गेल्याने काही प्रसंगात वन्यजीव मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

२ या अनुषंगाने वनक्षेत्रात सर्वत्र प्लॅस्टीक पिशव्यांच्या वापरावर कडक निर्बंध आणणे आवश्यक आहे. याबाबत सक्त सूचना देणारे फलक प्रवेशाच्या ठिकाणी लावण्यात यावेत व उल्लंघन झाल्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम ३२ व कलम ३५ (८) तसेच भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६ व ३२ इत्यादी अन्वये संबंधित क्षेत्रात कडक कारवाई करण्यात यावी.

३. उपरोक्त बाबींस विविध प्रसार माध्यमातूनही प्रसिध्दी देण्यात यावी.

४. वनरोपणाच्या कामासाठी प्लॅस्टीकच्या पिशव्या वापरणे आवश्यक असले तरी वनरोपण झाल्यावर अशा पिशव्या तात्काळ गोळा करून वनक्षेत्रे प्लॅस्टीकमुक्त करणे ही त्या-त्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांची जबाबदारी असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नीला सत्यनारायण
( नीला सत्यनारायण )
प्रधान सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्र. मु. वनसंरक्षक
कार्यालय म. रा. नागपूर
आवक क्रमांक ... ११९५
दिनांक ... २२/२/०७

**प्रति :-**

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ मर्यादित, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

रोशा/वन-१९७३(२५०-२-०७)१